जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/1765 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 25/07/2024

# दक्षता विभागाचे परिपत्रक -१४

विषय- मुंबई मंडळाच्या वसाहतीतील मोकळ्या जागा / मैदाने वापरासाठी आकारावयाच्या दरांबाबत.

मुंबई मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या मोकळ्या जागा / मैदाने धार्मिक उत्सव, औद्योगिक प्रदर्शने सेवाभावी संस्थांचे कार्यक्रम इ. तात्पुरत्या प्रयोजनासाठी विविध संस्थांना / व्यक्तिना भाड्याने देण्यात येतात.

प्राधिकरण ठराव क्र. ५५३२ दि. १७/०१/२००० अन्वये मोकळ्या जागांच्या तात्पुरत्या वापरासाठी वरील दर निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच सदर दरांमध्ये दरवर्षी १० टक्क्यांनी वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापि एका तक्रारी बाबत चौकशीच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की मुंबई मंडळाचे मोकळे भुखंड तात्पुरत्या स्वरुपात भाड्याने देताना वरीत ठरावात नमुद केलेल्या दरानुसार आकारणी न करता अन्य दरानुसार आकारणी केली जाते ज्या मुळे म्हाडाचे आर्थिक नुकसान होत आहे.

प्राधिकरणाने ठराव क्र. ५५३२ दि. १७/०१/२००० अन्वये मंजुर केलेले दर व त्यावरील वार्षिक वाढ याची परिगणना करुन मोकळ्या भुखंडाच्या तात्पुरत्या वापरासाठीचे शुल्काबाबतचा सुलभ तक्ता खाली नमुद करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्रयोजन | १७.०१.२००० चे ठरावानुसार दर (प्रती चौ. वार) | १७.०१.२००० चे ठरावानुसार दर (प्रती चौ. मी.) | सन २०२४ साठीचे दर (प्रती चौ. मी.) (दरवर्षी १० टक्के वाढ केल्यानंतर) |
|---|---|---|---|---|
| १ | वाणिज्य | ३.०० | ३.५९ | ३५.४४ |
| २ | सेवाभावी संस्थाचे कार्यक्रम [वाणिज्य वापर नाही] | १.५० | १.७९ | १७.७० |
| ३ | शासकिय संस्था [वाणिज्य वापर नाही.] | १.२० | १.४४ | १४.१६ |
| ४ | सर्कस | सर्कस वर बंदी असल्याने सर्कसीसाठी परवानगी देण्यात येऊ नये. | | |
| ५ | धार्मिक कार्यक्रम | ०.३० | ०.३६ | ३.५४ |
| ६ | कोणत्याही संस्थेचे प्रदर्शन व विक्री | ४.०० | ४.७८ | ४७.१६ |

या परिपत्रकाद्वारे असे सुचित करण्यात येते की,

(१) वर नमुद तक्त्यानुसार दर आकरण्यात यावेत व प्राधिकरणाचे ठरावानुसार त्यात दरवर्षी १० टक्के वाढ करण्यात यावी.

(२) अर्जात नमुद क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळाचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(३) भाड्याच्या रकमेची परीगणना करताना भुखंडावर सामान ठेवल्याचा दिवस, प्रत्यक्ष वापराचे दिवस व भुखंड पुर्णपणे रिक्त केल्याचा दिवस असे सगळे दिवस गृहीत धरण्यात यावेत.

(४) संस्था / व्यक्ती धार्मीक प्रयोजनासाठी अर्ज करतात जेणे करुन कमी शुल्क भरावे लागेल परंतू प्रत्यक्षात वाणिज्य वापर करतात. यास्तव भुखंड भाड्याने देताना प्रयोजनाची शहानीशा करावी जेणे करुन कमी दर आकारले जाणार नाहीत. तसेच प्रत्यक्ष वापराचे वेळी ज्या प्रयोजनासाठी अर्ज प्राप्त झाला आहे त्याच प्रयोजनासाठी भुखंड वापरला जात आहे याची शहानीशा करावी.

(५) मोकळे भुखंड तात्पुरत्या वापरासाठी प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्त्वावर देण्यात यावे.

(६) Wild Life Protection Act and Performing Animal Registration Rule अन्वये सर्कस वर बंदी आहे. यास्तव कोणत्याही सर्कसीस परवानगी देण्यात येवू नये.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,

मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.